
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांतील कल्याणकारी अर्थशास्त्र




**प्रतिभा लक्ष्मणराव मस्के**
**संशोधन विद्यार्थीनी ,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.**

## प्रस्तावना :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव भारतीय नव्हे तर जागतिक इतिहासातील अजरामर नाव आहे. विशेषतः पृथ्वीच्या संपूर्ण आर्युमानात/ आयुष्यात भीमराव आंबेडकर हे नाव **'कल्याणकारी विचारांचा राजा व परिवर्तनाचा कर्ता'** असाच राहील. कारण, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजक्रांतीकारक तत्ववेत्ते होते. याशिवाय राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, धर्म, इतिहास या विषयाचे व्यासंगी अभ्यासक आणि विश्लेषक तर होतेच, पण प्रथम क्रमांकाचे कायदे पंडित होते. या समृध्द ज्ञान भंडाराच्या आधारावरच त्यांनी भारतातील कोट्यावधी जनतेला अस्पृश्यतेच्या गुलामगिरीत हजारो वर्षे डांबून ठेवणाऱ्या जातीभेद प्रणित पुरातन वर्णाश्रम समाज व्यवस्थेच्या बुरूजावर आपल्या विचार शक्तीने घणाचे घाव घालून त्यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविल्या आणि अशा रीतीने या देशातील जनतेला लोकशाही क्रांतीचा मार्ग खुला करून दिला. म्हणजेच या देशाला सर्वोच्च ग्रंथ (संविधान) दिला. म्हणूनच त्यांचे नाव चिरंतन काळापर्यंत अजरामतर राहील. हे त्रिकालवादी सत्य आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समग्रपणे भारताच्या व जगाच्या राजकीय व आर्थिक व्यवस्थेचे/ स्थितीचे अध्ययन व संशोधन करून उच्च कोटींची तर्कशुध्द मांडणी केली आहे. शोषीत-पिडीत समाजाच्या सर्वांगीण व चिरंतन कल्याणासाठी कोणती आर्थिक, राजकीय व धार्मिक धोरणे घातक ठरलेली आहेत, कोणती धोरणे आर्थिक संरचनाने अंगिकारली पाहिजे याबाबतचे अभ्यास बाबासाहेबांनी केले. या अभ्यासातूनच बाबासाहेबांनी मानव जातीचे कल्याण साधण्यासाठी प्रयत्न केला. विशेषतः हे प्रयत्न आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक दृष्टिकोनातून यशस्वीदेखील झाले. मुख्यतः या प्रयत्नांना त्यांनी कार्यशक्तीसह बुध्दीप्रामाण्यवादी, विवेकवादी आणि कल्याणकारी विचारांची जोड दिली. त्यामुळेच भारतातील दलित समाज आर्थिक व सामाजिक विकासाच्या परीकक्षेत सामील झाला. एवढेच नव्हे तर या समाजातील काही भाग विकासाच्या पर्याप्त स्थितीपर्यंत पोहचलेला दिसून येतो.

अर्थात, जनसामान्य कुटुंबात जन्माला आलेल्या आंबेडकरांनी आपल्या कल्याणकारी विचारांतून मानवी विकास साधला. त्यामुळेच अशा महामानव, प्रज्ञासुर्य व्यक्तीचे कल्याणकारी विचार अभ्यासणे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण, बाबासाहेबांच्या या विचारातूनच कल्याणकारी अर्थशास्त्राचा शोध घेतला येईल.

## शैक्षणिक दृष्टी / शिक्षणविषयक विचार :-

शिक्षण हे समाज परिवर्तनाचं हत्यार आहे. शिक्षणाने माणसाला कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. हे ओळखून डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव करून देण्यासाठी शिक्षणाचं महत्त्व पटवून दिलं. **'शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे, ते प्यायल्यावर माणून गुरगुरायला लागतो'** असं ते आपल्या समाज बांधवांना कळकळीनं समजावून सांगत. मुख्यतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या जातीत जन्माला आले होते त्या जातीला आणि तत्सम इतर अनेक जातींना हिंदू धर्मातील जाती व्यवस्थेने शिक्षण घेण्याची संधी नाकारली होती. अलीकडील काळात सुध्दा जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आणि खालच्या जातीतील सर्वांनाच शिक्षण घेण्यासाठी किती त्रास आणि छळ सहन करावा लागला व आजही लागतो हेही आपणास पहावयास मिळते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लक्षात आले होते की, अडाणी माणूस मनाने गुलाम होतो. त्याचा अडाणीपणा त्याला लाचार, स्वत्वहीन करतो आणि त्यामुळे त्यांच्या जगण्यात न्यूनगंड निर्माण होतो. म्हणून या तळागाळातील समाजातील गुलामगिरी नष्ट करायची असेल,

न्यूनगंड नाहीसा करावयाचा असेल तर त्याला प्रथम शिक्षणाची दारे उघडी करून दिली पाहिजेत. अज्ञानामुळेच जाती संस्था बळकट झाली, हे सत्य बाबासाहेबांनी आपल्या चिंतनातून मांडले.

बाबासाहेबांच्या तीनही गुरूंनी शिक्षणाचे महत्त्व आपल्या काळात सांगितले. बुध्दाने **'दु:खाचे कारण मनुष्याची तृष्णा सांगितली आणि तृष्णाचे कारण अज्ञान'** सांगितले. तुम्ही स्वयंप्रकाशित व्हा म्हणजे ज्ञान मिळवा हे बुध्द सांगतो. जोतीबा फुले विद्येची मौलिकता अतिशय धार्मिक आणि समर्पक शब्दात सांगतात. **"विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीवीना वित्त गेले, वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.** तसेच **ज्ञानाशिवाय माणूस अंधळा आहे",** असे शिक्षणाचे महत्त्व सांगणारे कबीर किती मोठे, द्रष्ट आणि समाजशास्त्रज्ञ होते हेही आपणास त्यांच्या दोह्यावरून आढळून येते. हे ओळखूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खालच्या समाजाला शिक्षणाचे महत्त्व तितक्याच गंभीरतीने आणणि आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. देव आणि धर्म यांचा हवाला देऊन धर्म ग्रंथांमधून सांगितलेली चखलाखी आणि त्यामुळे खालच्या जातींना मानवी अधिकारांपासून कसे वंचित ठेवण्यात आले होते, हे जाणून घेण्यासाठी सुध्दा शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादली. त्याचप्रमाणे ज्या धर्माने एका वर्गाला ज्ञानार्जन आणि अर्थाजन करण्याचे जन्मत: अधिकार दिले आणि एका वर्गाला नाकारले त्या धर्माबद्दल बाबासाहेब म्हणतात, **"जो धर्म एका वर्गाने शिकू नये, धनसंचय करू नये, शस्त्र धारण करून नये, असे सांगतो तो धर्म नसून माणसाच्या जीवनाचे विडंबन आहे".**

अर्थात, जो धर्म अशिक्षितांना अशिक्षित रहा, निर्धनांना निर्धन रहा अशी शिकवण देतो तो धर्म नसून शिक्षा आहे. म्हणून ज्या समाजाला हजारो वर्षे शिक्षण नाकारण्यात आले आणि ज्ञानापासून वंचित ठेवण्यात आले त्या समाजाला बाबासाहेबांनी **"शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा"** असा मौलीक संदेश दिला. बाबासाहेबांनी शिक्षणाविषयक फक्त संदेश दिला नाही तर शिक्षण क्षेत्रातील अनेक विषयात सर्वोच्च प्राविण्य आणि पदव्या मिळविल्या. विशेषत: आपल्या शिक्षण काळात त्यांना आपल्या कर्तव्याची पूर्णपणे जाणीव होती म्हणून अनंत अडचणींवर मात करून त्यांनी आपली ध्येय गाठली. सन १९१५ साली त्यांनी एन्शन्ट इंडियन कॉमर्स म्हणजेच प्राचीन भारतातील व्यापार हा प्रबंध सादर करून एम. ए. ही पदवी मिळविली. नंतर त्यांनी **'नॅशनल डिव्हीडंट ऑफ इंडिया- ए हिस्टॉरिक ॲण्ड ॲनलिटिकल स्टडी'** या विषयावर प्रबंध लंडनमध्ये, **'दि इव्होल्यूशन ऑफ प्रॉव्हिन्शएल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया'** या नावाने प्रसिध्द झाला आणि नंतर कोलंबिया विद्यापीठज्ञने त्यांना पीएच.डी. ही पदवी दिली. हा प्रबंध त्यांनी कृतज्ञतेच्या भावनेने महाराजा सयाजीराव गायकवाड यांना अर्पण केला आणि पुढे चालूनच लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिकल्समध्ये प्रा. कॅनन यांच्या मार्गदर्शनाखाली जगविख्यात **'दि प्रॉब्लेम ऑफ दि रूपी'** हा ग्रंथ लिहिला.

### रुपयाची समस्या :-

केन्स सारख्या नामांकित अर्थतज्ज्ञानी सुवर्ण विनिमय प्रमाण चलन पध्दतीबद्दल जी मते मांडले होती, त्या सर्वच मतांशी डॉ. बाबासाहेबांनी पूर्णत: असहमती दर्शवून आपले म्हणणे विस्ताराने पुराव्यासह मांडून केन्सच्या मतांचे प्रभावीपणे खंडन केले. केन्ससह अनेकांचे मत होते की, सुवर्ण विनिमय प्रमाण पध्दतीत रुपयाची किंमत स्वयंचलितपणे स्थिर होऊ शकेल. पण डॉ. आंबेडकरांनी अनेक पुरावे, दाखले व आकडेवारी देऊन हे म्हणणे खोडून काढले व आपले मत मांडले की, जोपर्यंत रुपयाची क्रयशक्ती स्थिर होत नाही तोपर्यंत रुपयाची किंमत स्थिर होऊ शकत नाही. डॉ. आंबेडकरांच्या मते, **"रुपयाची सर्वसाधारण क्रयशक्ती जोपर्यंत आपण स्थिर करत नाही तोपर्यंत रुपयाची किंमत इतर कुठल्याही मार्गाने स्थिर होऊ शकत नाही".** ही प्राथमिक पण अत्यंत महत्त्वाची बाब केन्स यांनी पूर्णत: दुर्लक्षित केली पण प्रमाण पध्दतीत हे घडू शकत नाही. विनिमय पध्दती फक्त चलनाच्या दुखण्याची लक्षणे सांगू शकते, पण त्यावर इलाज करू शकत नाही. उलट या सुवर्ण विनिमय प्रमाण पध्दतीने चलनाचे दुखणे वाढतेय. साधारणत: रुपया स्थिर करण्याचा सर्वात उत्तम उपाय म्हणजे रुपयाची सोन्यामध्ये होणारी परिणामकारक परिवर्तनीयता बाबासाहेब हे नाकारत नाही. पण हा एक मार्ग झाला. बाबासाहेबांच्या मते, यापेक्षाही परिणामकारक मार्ग म्हणजे ठरावीक प्रमाणात वितरीत केला गेलेला अपरिवर्तनीय रूपया, त्यामुळेच रुपयाची स्थिरता वाढेल.

अर्थात, बाबासाहेबांनी रुपयाच्या समस्येबाबत जे काय लिहिले आहे ते मूलत: भारतीय गरीब जनतेच्या भल्याचा विचार करूनच लिहिले आहे. या गरीब जनतेला चलन व्यवस्थेच्या सर्वसाधारण नियमांची कसलीही जाण नाही वा माहिती नाही या कल्याणकारी विचारानेच बाबासाहेबांनी रुपयाच्या समस्येवर उपाय शोधला होता.

### लोकशाहीविषयक विचार :-

लोकशाहीची संकल्पना ही प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत शासनाचे एक स्वरुप अशीच राहिली आहे. साधारणत: लोकशाही ही केवळ शासन चालवण्याची प्रणाली नाही. सर्वप्रथम परस्परांसोबत राहण्याचे माध्यम आहे, तो परस्परांशी संवाद साधत घेतलेला अनुभव आहे. मूलत: ती आपल्या बांधवांविषयी आदर व पूज्यभाव असण्याची प्रवृत्ती आहे. कारण, बंधुता हे लोकशाहीचे दुसरे नाव आहे असे म्हणताना ते लोकशाहीची सांगड बंधुत्त्वाशी घालतात, तर दुसरीकडे त्यांच्या आवडती मूल्यत्रयी स्वतंत्रता, समता, बंधुता म्हणजेच लोकशाही आहे.

लोकशाही शासन प्रणाली अस्तित्त्वात येण्यासाठी लोकशाही मानणारा समाज असणे आवश्यक आहे. अन्यथा लोकशाहीच्या या औपचारिक चौकटीचा काही अर्थ नाही आणि जोवर सामाजिक लोकशाही येत नाही तोवर लोकशाही प्रणाली पूर्णपणे विसंगत ठरेल. लोकशाही ही केवळ शासन यंत्रणा नाही हे राजकारणी माणसांना कधीच कळले नाही. ती मूलत: एक समाज व्यवस्था आहे. दोन स्वतंत्र बाजू उघडपणे यात उदयाला आल्या आहेत. पहिली म्हणजे, माणसांचा परस्परविषयक दृष्टिकोन आपल्या सर्व बांधवांबद्दल आदरभाव व समता वाटणे इथे अभिप्रेत आहे. दुसरी बाब म्हणजे माणसां-माणसांत भेदभाव न करणारी सामाजिक रचना विसंगत आहे. विलगीकरण व वर्जकता याच्याशी लोकशाही विसंगत आहे. कारण त्यामुळे यामध्ये त्याचा परिणाम म्हणून विशेषाधिकार प्राप्त व विशेषाधिकार वंचित असे दोन वर्ग तयार होतात.

सामाजिक लोकशाही या व्याख्येत आर्थिक संस्थांचा अंतर्भाव केला जातो. भांडवलशाहीचे रूपांतर हळूहळू समाजवादात होईल असा फेबप्रणीत आशावादही त्यामागे आहे. पण आंबेडकरांच्या दृष्टीने लोकशाही म्हणजे श्रेणीबध्दता, अपवर्जन आणि विभक्तीकरण नसणारा समाज. त्यांचा संदर्भ भारतीय समाज आणि तेथील जातींविषयी आहे. साधारणपणे त्यात फेबप्रणीत सामाजिक लोकशाहीचा समावेश होतो. म्हणजेच त्यात सहकार आणि सहजीवन (म्हणजे बंधुता), समता (संधी तसेच निष्पत्ती) आणि स्वातंत्र्य यांचा अंतर्भाव होतो. परंतु, आंबेडकर त्यासोबत आर्थिक लोकशाहीची संज्ञा मांडतात, ज्यामध्ये प्रत्येक व्यक्तीला साधनसामुग्रीचे समान वितरण अपेक्षित आहे. म्हणूनच आंबेडकर लोकशाहीला तीन टप्प्यांत विभागतात. राजकीय म्हणजेच औपचारिक लोकशाही, सामाजिक लोकशाही म्हणजे सामाजिक समता आणि आर्थिक लोकशाही म्हणजे समाजवादाची दृष्टीची अर्थव्यवस्था, त्यातून स्वातंत्र्य, एकता, बंधुता हे त्यांच्या आदर्श लोकशाहीचे मुद्दे एकवटले जातील.

अर्थात, बाबासाहेबांचे एकूणच लोकशाही विचार बहुआयामी व कल्याणकारी आहे. कारण, त्यांच्या व्याख्येनुसार **"लोकशाही म्हणजे शासनाचा असा आकृतीबंध आणि कार्यपध्दत आहे ज्याद्वारे रक्तापाताशिवाय सामाजिक आयुष्यात क्रांतीकारी बदल घडवणे शक्य होते".**

## समाजवादी दृष्टी :-

लोकशाही प्रत्यक्षात येण्यासाठी उत्पादनाच्या साधनांवर समाजाची मालकी असायला हवी, असे त्यांचे मत होते. जवाहरलाल नेहरूंनी संविधान समितीत मांडलेल्या ठरावावर भाषण करताना दि. १७ डिसेंबर १९४६ रोजी त्यांनी असे मत व्यक्त केले की, या ठरावात प्रस्तावित केलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक न्यायाची हमी द्यायची असेल तर देशात समाजवादी अर्थव्यवस्था आवश्यक आहे. परंतु बाबासाहेब यावरही म्हणतात, **"मला हे समजू शकत नाही की जोवर या देशातील अर्थव्यवस्था ही समाजवादी स्वरुपाची नसेल तोवर भविष्यातील कोणत्याही सरकारला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय देणे कसे शक्य होईल".**

अर्थात, अर्थव्यवस्थेचे समाजवादी स्वरुप हे घटनेच्या कायद्याचा भाग असावा, ज्याद्वारे महत्त्वाच्या व मूलभूत उद्योगांवर राज्याची मालकी असेल. विम्यावर राज्याचा एकाधिकार असेल आणि देशातील प्रत्येक प्रौढ नागरिकाला त्यांच्या वेतनानुसार विम्याचे संरक्षण देणे बंधनकारक असेल. शेतीवर देखील राज्याचा अधिकार असेल. उद्योग, विमा व शेतजमीन यावरील व्यक्तींचे मालकी हक्क राज्यसंस्था विकत घेईल व त्याबदल्यात पूर्वीच्या मालकांना त्यांच्या मालमत्तेच्या प्रमाणात ऋणपत्रांच्या स्वरुपात मोबदला देण्यात येईल. संपूर्ण कृषी व्यवसायाची सामूहिक तत्त्वावर पुनर्रचना करण्यात येईल. राज्याने ताब्यात घेतलेल्या जमिनीचे प्रमाणित आकारात तुकडे करण्यात येतील ते तुकडे गावकऱ्यांना भाडेपट्ट्यावर कसण्यासाठी देण्यात येईल व त्यात जात किंवा पंथाच्या आधारावर कोणताही भेदभाव करण्यात येणार नाही. हे तुकडे शेतकरी सामूहिक तत्त्वावर कसतील आणि जमिनीचे भाडे, उपकरणे, अर्थपुरवठा व अन्य निविष्ठांच्या बदल्यात सरकारला ते ठराविक रक्कम अदा करतील अशा प्रकारच्या व्यवस्थेची संकल्पना त्यांनी मांडली.

मुळात ही योजना त्यांनी आपल्या **'स्टेटस ॲण्ड मायनॉरिटीज'** या ग्रंथात विस्ताराने मांडली आहे. दुर्दैवाने त्यांच्या कल्पनांचा संविधानिक समितीने स्वीकार केला नाही. मात्र, त्यातील काही तुकडे तोडून संविधानाच्या चौथ्या भागातील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये त्याचा समावेश केला गेला. ज्यांची अंमलबजावणी करणे हे राज्यकर्त्यांच्या मर्जीवर सोडून देण्यात आले. विशेषत: **आनंद तेलतुंबडेचे** या बाबींवरील समीक्षा अभ्यासली तर असे दिसून येते की, **"संविधानाच्या अंमलबजावणीचा साठ वर्षांचा इतिहास पाहिला तर आपल्या लक्षात येईल की, राज्यसंस्थेने विविध धोरणे बनवताना या मार्गदर्शक तत्त्वांना पायंदळी तुडवले आहे. उदा. जागतिकीकरणासाठी बनविण्यात आलेल्या संपूर्ण धोरणांचे पॅकेज हे या मार्गदर्शक तत्त्वांशी पूर्णत: विसंगत आहे".**

## संविधानिक दृष्टी :-

संविधान म्हणजे लोकशाहीतील राजकीय शासन व्यवस्थेसाठी एक नियम पुस्तकच आहे. सुदैवाने मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने आंबेडकर संविधानाचे मुख्य रचनाकार बनले. भारताचे संविधान जसे प्रतिंबित होते त्यापेक्षा त्यांची दृष्टी फारच भिन्न आहे हे लक्षात घेतले पाहिजे. फक्त राजकीय लोकशाहीवर ते कधीच संतुष्ट नव्हते. कारण त्यांना माहीत होते की, आर्थिक लोकशाहीशिवाय त्याला काहीही अर्थ नाही. म्हणूनच समाजाच्या आर्थिक रचनांचे सुस्पष्ट संकेतन संविधानात केले पाहिजे, ज्यामुळे बहुमताच्या जोरावर राजकीय लोकशाहीद्वारे संविधानाचे स्वरुप बदलणे कोणालाही शक्य होणार नाही असे ते मानीत. अशा प्रकारची वैचारीक स्पष्टता उदारमतवादामध्ये क्वचितच

आढळते. आंबेडकर जरी मुलतः उदारमतवादी होते. तरीही त्यांच्या गुणवैशिष्ट्यांमुळे उदारमतवादाच्या मर्यादा ओलांडून पलीकडे जाणे त्यांना सहज शक्य झाले.

अर्थात, बाबासाहेबांची संविधानाबाबतची दूरदृष्टी अतिशय व्यापक होती. त्यामुळेच देशाला दिलेला इशारा आज अधिकच प्रासंगिक ठरत आहे की, **'२६ जानेवारी १९५० रोजी आपण एका आंतरविरोधाच्या आयुष्याला सुरुवात करणार आहोत. आमच्या राजकारणात समता असेल, मात्र सामाजिक आणि आर्थिक बाबतीत विषमता. आम्ही हा आंतरविरोध शक्य तितक्या लवकर पुसला पाहिजे. अन्यथा, विषमतेचे बळी या देशातील लोकशाहीची रचना, जी येथील संविधानिक समितीने अतिशय काळजीपूर्वक घडवली आहे, उध्दवस्त करतील'.**

### उद्योगविषयक विचार :

ज्या देशामध्ये भांडवलशाहीचा उदय झाला तो देश इंग्लंड व युरोपातील देशांचा औद्योगिकीकरणामुळे त्याचा जलद गतीने आर्थिक विकास घडवून आला हे डॉ. बाबासाहेबांनी प्रत्यक्षात पाहिले व अनुभवले होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांच्या मते, भारताचा आर्थिक विकास करण्यासाठी औद्योगिकीकरण फार महत्त्वाचे आहे. देशामध्ये उद्योगधंद्याचा विकास करीत असताना औद्योगिकीकरणातून आर्थिक विषमता व आर्थिक संपत्तीचे मक्तेदारी किंवा केंद्रीकरण होता कामा नये. तसेच औद्योगिक असमतोल देखील होता कामा नये. डॉ. बाबासाहेबांच्या मते, उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करावे विशेषतः सार्वजनिक मालकीचे काही मूलभूत स्वरुपाचे उद्योग शासनाने चालवावे व अशा प्रकारचे उद्योग सुरू करण्यासाठी शासनानी पुढाकार घ्यावा. मुख्यतः उद्योग सुरू करण्यासाठी काही महामंडळाची स्थापना करावी आणि विमा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करावे.

शक्यतो उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर त्यावर शासनाची मालकी हक्क प्रस्थापित झाल्यामुळे त्या उद्योगधंद्यावर शासनाचे नियंत्रण येईल. त्यामुळे शासन ही प्रशासकीय संस्था सामाजिक लोककल्याणाच्या हेतूने प्रेरीत झालेली असते. फलस्वरुप उत्पादनात वाढ होईल. कामगारांना योग्य वेतन मिळेल. नागरीकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता मिळेल. उदा. नैसर्गिक आपत्ती, अपघात, आजार, पेन्शन, वृध्दपकाळ या प्रसंगांना शासनाकडून वित्तीय आर्थिक मदत मिळेल.

डॉ. बाबासाहेबांच्या मते, भारतात उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी सरकारने पुढाकार घेऊन उद्योग स्थापन करण्यास लोकांना प्रोत्साहन द्यावे. त्याचप्रमाणे उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची कार्यक्षमता वाढवावी. त्यासाठी त्यांना शिक्षण व प्रशिक्षणाच्या कार्यक्रम सरकारने हाती घ्यावा. उद्योगधंदा वाढविण्यासाठी शासनाने मूलभूत/ आधारभूत दळणवळणाच्या वाहतुक, सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

### श्रमिक कल्याण :-

कामगार नेता म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली भूमिका पार पाडली. शेतकऱ्यांचे हित साध्य करण्यासाठी मुंबई विधिमंडळात एक विधेयक मांडले. शेतजमीन कसणाऱ्या कुळांची गुलामगिरी नष्ट करण्याच्या हेतूने प्रांतीक विधिमंडळात अशा तऱ्हेचे विधेयक मांडणारे डॉ. बाबासाहेब पहिलेच सदस्य होते. खोती नष्ट होऊन कुळांना जमिनीचे स्वामित्त्व मिळावे हा त्यांच्या विधेयकाचा मुख्य हेतू होता. परंतु राज्यकर्त्यांनी हे विधेयक मंजूर होऊ दिले नाही. त्यानंतर त्यांनी महार वतन विधेयक सुध्दा मांडले. परंतु ते ही शेवटीपर्यंत संमत झाले नाही.

डॉ. बाबासाहेबांचा कम्युनिस्ट कामगार चळवळीला विरोध होता. कारण कम्युनिस्ट हे आपले राजकीय ध्येय साध्य करण्यासाठी कामगारांचा केवळ वापर करतात. त्यामुळे कामगारांचे हित साध्य होत नाही असे बाबासाहेबांचे मत होते. त्यांनी काँग्रेस पक्षाला सुध्दा समाजवादाच्या बुरख्याखाली भांडवलशाहीला खतपाणी घालणारा पक्ष ठरविले होते. कारण, काँग्रेस पक्ष वर वर जरी समाजवादाच्या गोष्टी करीत असला तरी या पक्षात धनिकांचा जास्त भरणा असल्यामुळे कामगार व श्रमिकांनी आपल्या कल्याणासाठी काँग्रेस पक्षावर अवलंबून राहणे मुर्खपणाचे होईल असे ते मानत. त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. कारण त्यांना कामगार, शेतकरी व मजुरांना न्याय मिळवून द्यायचा होता व एक सक्षम राजकीय पर्याय म्हणून हा पक्ष बळकट करायचा होता.

दिल्ली येथे भरलेल्या सातव्या हिंदी कामगार परिषदेमध्ये अध्यक्ष म्हणून भाषण करताना डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, कामगार धनिक वर्गाला एक महत्त्वाचा प्रश्न विचारू शकतात, तो म्हणजे हा की, जर युध्दाच्या खर्चासाठी मालक वर्ग कर देण्यास नकार देत नाही तर कामगारांच्या जीवनाचा दर्जा वाढविण्यासाठी जो निधी उभारावयाचा आहे त्याला तुम्ही विरोध का करता? जो खर्च युध्दावर झाला आहे तो लोक कल्याणासाठी खर्च झाला असता तर त्यातून कितीतरी लोकांचे शिक्षण झाले असते आणि कितीतरी रोगी बरे झाले असते.

औद्योगिक शांतता प्रस्थापित करण्याच्या शक्यतेविषयी डॉ. आंबेडकरांनी आपले मत मांडले होते की, सत्तेच्या बळावर औद्योगिक शांतता प्रस्थापित करणे शक्य नाही. कायद्याच्या बळावर ती शक्य आहे. परंतु ती खात्री देता येत नाही. ती सामाजिक न्यायनीतीच्या बळावर करता येणे शक्य आहे आणि ही सूचना आशादायक वाटते. परंतु त्यात तीन बाजू गुंतलेल्या आहेत. पहिली म्हणजे स्वतः कामगारांनीच आपले काम करण्याचे कर्तव्य ओळखले पाहिजे. म्हणजेच त्यांनी कामचूकारपणाची वृत्ती टाकून दिली पाहिजे. दोन मालकाने कामगारांना योग्य ते वेतन देणे याचा अर्थ पिळवणूक थांबविणे आणि मालकांनी कामगारांना काम करण्यास सुखावह परिस्थिती निर्माण करणे, म्हणजेच कामगार कल्याण

साधने आणि तिसरी गोष्ट म्हणजे सरकार आणि समाज यांनी औद्योगिक संबंध सलोख्याचे रहावे यासाठी झटले पाहिजे. हे सार्वजनिक काम आहे हे केवळ मालक आणि कामगार यामधील केवळ करार नाही हे ओळखता आले पाहिजे. असे मत आंबेडकरांनी त्यावेळी व्यक्त केले होते.

अर्थात, उपरोक्त श्रमिकांविषयी विचारांचा व कार्याचा अभ्यास केल्यानंतर आपल्या लक्षात येते की, डॉ. आंबेडकरांनी आपल्या जीवनात शोषीत, कामगार व मजूर यांच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. आजची ती कल्याणकारी नीती शासन राबवित आहे. ती डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्या काळातच सांगितली होती. यावरून त्यांची दूरदृष्टी आणि सामान्यांप्रती असलेला जिव्हाळा दिसून येतो.

**आर्थिक अस्पृश्यता :-**

या देशात वर्षानुवर्षे धर्ममार्तंडाकडून राबवण्यात येत असलेली अस्पृश्यता ही आर्थिक शोषणाची अवस्था आहे. अस्पृश्यतेविषयी डॉ. आंबेडकर म्हणतात, अस्पृश्यता ही एक धार्मिक रूढी आहे असा बऱ्याच लोकांचा विश्वास आहे आणि तो बरोबरच आहे. पण ती केवळ एक धार्मिक रूढी आहे असे समजणे चूक ठरेल व तिला एक आर्थिक बाजूही आहे आणि त्यामुळे ती गुलामगिरीपेक्षाही भयंकर ठरते. गुलामगिरीत मालकांवर किमानपक्षी गुलामाच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची त्यासोबतच त्यास धडधाकट ठेवण्याची जबाबदारी असे झाले नाही तर गुलामाची बाजारातील किंमत कमी होईल ही भीती असे. अस्पृश्यतेच्या पध्दतीत हिंदू समाज अस्पृश्यांना जगविण्याची कोणतीही जबाबदारी घेत नाही. या आर्थिक पध्दतीला जबाबदारी शिवाय पिळवणूक करण्याची परवानगी होती. अस्पृश्यता केवळ धार्मिक शोषणाची पध्दत आहे असे नाही तर ती अनियंत्रित आर्थिक शोषणाची पध्दत आहे.

अर्थात, बाबासाहेब अस्पृश्यतेच्या पाठीमागे आर्थिक कारणांचा संचय असल्याचे मानते आणि ही बाब प्रासंगिकतेतही खरी ठरत आहे.

**समारोप :**

वरील सर्व गोष्टी लक्षात घेतली तर असे स्पष्टपणे दिसून येते की, डॉ. बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांचा कल हा समाजवादी, समाजव्यवस्थेच्या स्थापनेच्या बाजूचा होता. मात्र, आज त्याची प्रतिमा केवळ सामाजिक क्रांतीकारक म्हणून पुढे आणली जाते. परंतु त्यांच्या कल्याणकारी आर्थिक विचारांकडे दुर्लक्ष करण्यात येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या काठमांडूच्या भाषणात बुध्द आणि मार्क्स यांची दोघांची तुलना करताना दोघांचेही ध्येय सर्व प्रकारच्या शोषणापासून मुक्त असलेला व समता, बंधुता, स्वातंत्र्य या गुणांनी युक्त असलेला समाज निर्माण करण्याचे होते. हे स्पष्टपणे नमूद केले आहे. आज त्यांची जयंती साजरी करीत असताना बुध्द मार्क्स आणि फुले-आंबेडकर यांना अभिप्रेत असणारा वरील समाज निर्माण करणाची आपण मनाशी खुणगाठ बांधली पाहिजे. त्यासाठी बुध्दीप्रामाण्यवादी, विवेकवादी, प्रज्ञासुर्य, महामानव व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कल्याणकारी आर्थिक विचार समजून घेऊन वाटचाल केली पाहिजे.

**संदर्भ :-**


१) बी. आर. आंबेडकर (१९२३), दी प्रॉब्लेम ऑफ दी रूपी इटस ओरीजन ॲण्ड इटस सोल्यूशन, मराठी भाषांतर एस.एस. यादव (२०११-१२), रुपयांपुढील समस्या : उगम व उपाय, रोडगे प्रकाशन, नागपूर.
२) जीन ड्रीझ (२००५), डॉ. आंबेडकर ॲंड द फ्यूचर ऑफ इंडियन डेमॉक्रसी, इंडियन जर्नल ऑफ ह्यूमन राईटस, दिल्ली.
३) आंबेडकर बी. आर. (१९७९), बाबासाहेब आंबेडकर- राईटिंग्ज ॲंड स्पिचेस (बीएडब्ल्यूएस), भाग पहिला, वसंत मून, शिक्षण विभाग, महाराष्ट्र, मुंबई.
४) आंबेडकर बी. आर. (१९७९), बाबासाहेब आंबेडकर- राईटिंग्ज ॲंड स्पिचेस (बीएडब्ल्यूएस), भाग तेरा, वसंत मून, शिक्षण विभाग, महाराष्ट्र मुंबई.
५) तेलतुंबडे आनंद (२०१३), लोकशाही आणि सामाजिक परिवर्तन : डॉ. आंबेडकरांचे मर्मज्ञान, लेख योजना, प्रकाशन माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, वर्ष ४१, अंक ५, मुंबई.
६) नाईक एस. एस. (२०११), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टितून श्रमिक कल्याण, लेख अर्थसंवाद, खंड-३५, अंक ३, जळगांव.
७) तेगमपूरे मारोती (२००५), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार, लेख, जीवन मार्ग वर्ष ४१, अंक १३, मुंबई.
८) खंदारे एस. एम. (२०११), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
९) निंबाळकर वामन (२००४), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार व कार्य, लेख, लोकराज्य, मुंबई.
१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१९७९), संस्थाने आणि अल्पसंख्यांक समाज, अनुवाद वसंत मून, रोडगे प्रकाशन, नागपूर.